**आकाशवाणी नागपूर**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक १९ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

- **पावसाशी संबंधित दुर्घटनांमधे राज्यात 8 जणांचा मृत्यू, तर सुमारे 12 ते 14 लाख एकर क्षेत्रावरच्या पिकांचं नुकसान.**
- **विदर्भात चंद्रपूर जिल्ह्याला अती मुसळधार पावसाचा रेड अलर्ट तर पूर्व विदर्भातील बहुतांश जिल्ह्यात ऑरेंज अलर्ट जारी.**
- **उपराष्ट्रपतीपदाच्या आगामी निवडणुकीसाठी इंडी आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी.सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी.**
- **महाराष्ट्रात 42 हजार 892 कोटींची गुंतवणूक, 25 हजार 892 रोजगाराची निर्मिती- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 10 सामंजस्य करारावर स्वाक्षरी.**

अतिवृष्टीमुळे नुकसान

राज्यात सर्वत्र गेल्या तीन-चार दिवसांत मोठ्या प्रमाणात झालेल्या अतिवृष्टीमुळे राज्यात ८ जणांचा बळी गेला असून सुमारे १२ ते १४ एकरावरच्या पिकांना फटका बसल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वार्ताहरांशी बोलताना दिली.......

***विशेषतः आपल्याला माहिती आहे की नांदेड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात जी काही ढगफुटी सदृश परिस्थिती झाली. त्याच्यामध्ये आठ लोकांचा जवळपास मृत्यू झालेला आहे. ओव्हर ऑल आता परिस्थिती बऱ्यापैकी नियंत्रणात आहे. मुंबईमध्येही मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. काही भागांमध्ये जवळपास 300mm पर्यंतची अतिवृष्टी ही झालेली आपल्याला पाहायला मिळाली. त्यामुळे जो काही विसर्ग आहे त्याचे जे मॅनेजमेंट त्या राज्यांसोबत करावं लागतं ते मॅनेजमेंट आपण चांगल्या पद्धतीने करतो आहोत. बऱ्यापैकी बाजूचे राज्य देखील आपल्याला मदत करायची ती मदत करत आहेत.***

गडचिरोलीत पहाटेपासून संततधार पाऊस कोसळत आहे. बुलडाणा जिल्ह्याच्या चिखलीमध्ये एकजण पुरात वाहून गेला. हजारो हेक्टरवरची पिकं पाण्याखाली गेली असून अनेक गावांचा संपर्क तुटला आहे.

<u>आपत्ती व्यवस्थापन</u>

राज्यात अनेक ठिकाणी होत असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात राज्यातील मुसळधार पाऊस आणि पूर परिस्थितीचा आढावा घेतला. राज्यात पावसाची संततधार सुरू असून १० लाख एकर शेती पाण्याखाली गेली आहे. राज्यातील जी धरणे भरली आहेत त्या ठिकाणी जलसंपदा आणि शासकीय यंत्रणेमार्फत लक्ष ठेवण्यात येत आहे. नदीकाठच्या लोकांना ज्या ठिकाणी धोका पोहोचण्याची शक्यता आहे त्यांना सावध करण्यासाठी शासकीय यंत्रणेमार्फत संदेश पोहोचवण्याच काम करण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी त्यांचे सुरक्षित स्थळी स्थलांतर करण्यात आले आहे. सर्व नागरिकांना खबरदारी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आवश्यकता असेल तरच नागरिकांनी घराबाहेर पडाव,अस आवाहन करण्यात आल आहे.आपत्ती व्यवस्थापन कक्षांमध्ये अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून देशाचे नकाशे,वारे,पाऊस सर्वदूर पसरल्याची माहिती या कक्षामार्फत दिली जात आहे. दर तीन तासाला अपडेट दिले जात आहेत, अशी माहितीही उपमुख्यमंत्री पवार यांनी दिली.

<u>उपराष्ट्रपती निवडणुक</u>

उपराष्ट्रपती पदाच्या आगामी निवडणुकीसाठी इंडी आघाडीकडून सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश न्यायमूर्ती बी.सुदर्शन रेड्डी यांना उमेदवारी देण्यात आली आहे. इंडी आघाडीच्या सर्व घटक पक्षांनी एकमतान रेड्डी यांच्या नावाला संमती दिल्याची माहिती काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी आज नवी दिल्लीत इंडी आघाडीच्या घटकपक्षांच्या संयुक्त वार्ताहर परिषदेत दिली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या संसदीय पक्षाच्या आज नवी दिल्ली इथं झालेल्या बैठकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे

उमेदवार सी.पी.राधाकृष्णन यांचा परिचय करून दिला, आणि त्यांची एकमतानं निवड करण्याचं आवाहन केलं.

## राज्य मंत्रीमंडळ निर्णय

मुंबईतल्या टाटा मेमोरियल सेंटरच्या एकात्मिक आयुर्वेदिक कर्करोग दवाखाना आणि संशोधन केंद्रात १०० खाटांचं रुग्णालय उभारण्यासाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय आज राज्य मंत्रिमंडळान घेतला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रिमंडळाची बैठक आज मुंबईत झाली. राज्यातल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात गट क आणि तांत्रिक संवर्गात २९ दिवस तत्त्वावर कार्यरत १७ कर्मचाऱ्यांची तातपुरती सेवा नियमित करण्याला मंत्रिमंडळान आज मान्यता दिली.

## याचिका

सर्वोच्च न्यायालयान महाराष्ट्र विधानसभा निवडणूक रद्द करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळली आहे. विक्रोळी मतदारसंघातील मतदार चेतन चंद्रकांत अहिरे यांनी सदर याचिका दाखल केली होती. त्यांच्या म्हणण्यानुसार, नोव्हेंबर 2024 मध्ये झालेल्या निवडणुकीदरम्यान मतदान संपल्यानंतर सुमारे 76 लाख बनावट मते टाकण्यात आली होती. न्यायाधीश एम.एम. सुंदरेश आणि न्यायाधीश एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठान या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाचा निकाल कायम ठेवला. कोर्टान म्हटल की, अहिरे यांच्या याचिकेत कायदेशीर आधार, वस्तुनिष्ठता आणि वैधता यांचा अभाव आहे.

## सामंजस्य करार

महाराष्ट्र "डेटा सेंटर कॅपिटल" आणि "सौरऊर्जा एकत्रीकरण कॅपिटल" म्हणून पुढे येत आहे. अनेक कंपन्या या क्षेत्रांत येत असून उत्पादन क्षेत्रातही मोठी क्रांती घडणार आहे. यूकेसोबत झालेल्या रणनीतिक करारामुळ नवे दरवाजे उघडले असून भारतात अधिक गुंतवणूक होत आहे. हे गुंतवणूकदारांचा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वावरील विश्वासाचे द्योतक आहे. आज विविध गुंतवणुकींसाठी महत्त्वपूर्ण असे आठ सामंजस्य करार आणि दोन रणनीतिक

करार करण्यात आले असून, त्यातून राज्यात तब्बल 42 हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होऊन 28 हजारांपेक्षा जास्त रोजगार निर्मिती होणार असल्याच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज सांगितल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थित आज मुंबईच्या मंत्रालयातील समिती कक्षात 10 सामंजस्य करारांचे आदानप्रदान करण्यात आले. त्यावेळी ते गुंतवणूकदारां समोर बोलत होते.

संप

शासकीय सेवेत नियमित समायोजन करावे, या प्रमुख मागणीसह अन्य मागण्यांसाठी राष्ट्रीय आरोग्य अभियान कंत्राटी कर्मचारी संघटनेन आजपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. गडचिरोली जिल्ह्यातील सुमारे १ हजार २०० कंत्राटी कर्मचारी यात सहभागी झाल्यान आरोग्यविषयक कामकाज प्रभावीत झाले आहे. १४ मार्च २०२४ रोजी राष्ट्रीय आरोग्य अभियानातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत समायोजित करण्यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित झाला आहे. परंतु सव्वा वर्ष होऊनही या निर्णयाची अंमलबजावणी झालेली नाही. त्यामुळे कंत्राटी कर्मचाऱ्यांनी बेमुदत कामबंद आंदोलनाचे शस्त्र उगारले आहे. दरम्यान, ऐन पावसाळ्यात जिल्ह्यात हिवताप, डेंग्यू आणि अन्य साथीच्या आजारांनी डोके वर काढले असताना कंत्राटी आरोग्य कर्मचाऱ्यांनी कामबंद आंदोलन सुरु केल्यान आरोग्य व्यवस्थेवर विपरित परिणाम होण्याची शक्यता आहे.

हवामान

नागपूरच्या प्रादेशिक हवामान खात्यान आज चंद्रपूर जिल्ह्याला मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा रेड अलर्ट घोषित केला असून अति सतर्कतेचा इशारा दिला आहे. गोंदिया, गडचिरोली, वर्धा आणि नागपूर जिल्ह्याला मुसळधार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला असून पश्चिम विदर्भात येलो अलर्ट देण्यात आला आहे. दरम्यान, अमरावतीच्या मेळघाटातील पंचतरीतांसह उपनद्यांनी निर्धारित सीमारेषा ओलांडून पुरसदृश्य परिस्थिती निर्माण केली आहे. यवतमाळ जिल्ह्यातील पुसद तालुकात असलेल्या ईसापुर धरणाचे 13 दरवाजे उघडले आहे,

त्यामुळे पैनगंगा नदीला मोठा पूर आला आहे. सदर पुराचे पाणी उमरखेड तालुक्यातील संगम चिंचोली, पळशी, करोडी, इत्यादी गावात घुसले आहे. दरम्यान, पुढील काही तासांमध्ये गोंदिया, भंडारा, नागपूर, वर्धा, अमरावती, चंद्रपूर, गडचिरोली, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा येथे हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

<u>अच्युत पोतदार निधन</u>

ज्येष्ठ अभिनेता अच्युत पोतदार यांचं काल रात्री, ठाण्यातल्या ज्युपिटर रुग्णालयात निधन झालं. ते ९१ वर्षांचे होते. मध्यप्रदेशातल्या मराठी भाषक कुटुंबात जन्मलेले पोतदार यांचं बालपण आणि शिक्षण इंदूरमधे झालं. रेवा इथल्या महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून काम केल्यानंतर ते लष्करात भरती झाले, आणि कॅप्टन म्हणून १९६७ मधे निवृत्त झाले. नंतर इंडियन ऑईलमधे नोकरीत असताना त्यांनी अभिनयाचा छंद जोपासला. नंतर मराठी रंगभूमी, दूरचित्रवाहिनी मालिका, आणि चित्रपटांमधे विविध चरित्र भूमिकांमधे त्यांनी ठसा उमटवला. १९८० मधे ‘आक्रोश’ आणि ‘अल्बर्ट पिंटो को गुस्सा क्यों आता है’ या गाजलेल्या चित्रपटात त्यांनी काम केलं आणि नंतर ‘अर्धसत्य’, ‘नासूर’, ‘तेजाब’, ‘प्रहार’, ‘वंश’, ‘चमत्कार’, ‘रंगीला’, ‘अग्निसाक्षी’, ‘तीसरी आंख’, ‘परिणीता’ अशा तब्बल सव्वाशे चित्रपटांमधे त्यांनी काम केलं.

****